जलसंपदा विभागातील अभियांत्रिकी सेवेतील गट-अ (राजपत्रित) व गट-ब (राजपत्रित / अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या नागरी सेवा मंडळांची कार्यकक्षा व कार्यप्रणाली.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- नासेमं २०१४ /(प्र.क्र.१८/१४)/ आस्था (संनि)
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :-१० नोव्हेंबर, २०१७.

संदर्भ :- १. जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक - नासेमं-२०१४/(प्र.क्र.१८/१४)/आस्था(संनि), दिनांक २९.८.२०१५.
२. जलसंपदा विभाग, शासन शुद्धीपत्रक, क्रमांक - नासेमं-२०१४/(प्र.क्र.१८/१४)/आस्था(संनि), दिनांक १६.९.२०१५.
३. शासन परिपत्रक, क्रमांक- नासेमं २०१४ /(प्र.क्र.१८/१४)/ आस्था (संनि), दि. २१/१०/२०१५.
४. शासन पूरकपत्र क्रमांक- नासेमं २०१४ /(प्र.क्र.१८/१४)/ आस्था (संनि), दि. ०२/०८/२०१६.

परिपत्रक :-

संदर्भ क्र.१ ,२ व ४ येथील शासन निर्णय, शुध्दीपत्रक व पुरकपत्रान्वये जलसंपदा विभागातील गट-अ (राजपत्रित) व गट-ब (राजपत्रित / अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदल्यांबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठी नागरी सेवा मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकान्वये सदर नागरी सेवा मंडळांची कार्यकक्षा व कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. ८ नंतर खालील प्रमाणे परिच्छेद ९ समाविष्ट करण्यात येत आहे.

नागरी सेवा मंडळांच्या बैठकांबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) नागरी सेवा मंडळाच्या बैठकांच्या तारखा नागरी सेवा मंडळांच्या अध्यक्षांनी त्यांच्या सोयीनुसार व कामाच्या आवश्यकतेनुसार निश्चित कराव्यात,

ब) बैठकीत विचाराधीन अधिका-यांचा संपूर्ण सेवा तपशील ठेवण्यात यावा.

क) पदस्थापने संदर्भात प्राप्त झालेल्या शिफारशी / विनंती अर्ज याचा तपशील बैठकीत ठेवण्यात यावा.

ड) रिक्त जागांचा तपशिल खालील प्रमाणे सादर करावा-

i) मा. मंत्री महोदयांकडे / सक्षम प्राधिका-याकडे पदस्थापनेसाठी शिफारस केलेल्या जागा.

ii) मा. मंत्री महोदयांकडे / सक्षम प्राधिका-याकडे पदस्थापनेसाठी शिफारस केलेल्या जागेंव्यतिरिक्त रिक्त असलेल्या जागा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७१११०१२४०३९३४२७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinayak Vishwanath Lawate

Digitally signed by Vinayak Vishwanath Lawate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6e5bc7ae10ae9ecaa376fe734f5ee18589f6a42c0c82108b047be5703d1af3, serialNumber=81fd2869906a1aeee21da3e5d509f89daa03571d84025e4321bc9f87546c02a1, cn=Vinayak Vishwanath Lawate
Date: 2017.11.10 12:29:18 +05'30'

(विनायक लवटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव (जलसंपदा), सचिव (लाक्षेवि) व सचिव (प्रकल्प समन्वय) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
३) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण व संशोधन, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
४) महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.
५) सर्व कार्यकारी संचालक, सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
६) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल-१/२ , लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८) महालेखापाल-१/२, लेखा परिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९) मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव
१०) मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव.
११) उप सचिव (सेवा) / उपसचिव (आस्था), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) उप सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) कार्यासन अधिकारी - आस्थापना (मंत्रालय) / आस्थापना (तांत्रिक) / आस्थापना (अतांत्रिक), /आस्थापना (वर्ग-१) / आस्था (वर्ग-२) / आस्था (स.अ.श्रेणी-२) / आस्था (शाखा अभियंता) / गोपनीय शाखा / नोंदणी / रोख शाखा, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) संग्रहार्थ / आस्था (संनि).